महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसिवर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.आशिप्र-१६२०/प्र.क्र.०२/AIA-PGET/AIQ&State/सुचना क्र.०३/२०२०/१८८६ दिनांक :१८/१२/२०२०

## सुचना क्र.०३

## AIA PGET - 2020

आयुष पदव्युत्तर आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी अभ्यासक्रमाचे राज्य स्तरीय कोट्याच्या आणि १५% ऑल इंडिया कोट्याच्या नोंदणी प्रक्रियेबाबत

संदर्भ :- १) या कार्यालयाकडून प्रसिध्द सूचना क्र. No.Ayush-1620/C.R.No.02/AIAPGET 2020 /Notice No.01/AIQ/Online Appli./1237/2020, Date : 14/12/2020

२) या कार्यालयाकडून प्रसिध्द सूचना क्र. No.Ayush-1620/C.R.No.02/AIAPGET 2020 /Notice No.02/AIQ/Online Appli./1238/2020, Date : 14/12/2020

३) उमेदवारांचे प्राप्त ईमेल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी आयुष पदव्युत्तर आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी अभ्यासक्रमाच्या राज्य स्तरीय कोट्याच्या आणि १५% ऑल इंडिया कोट्याच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ नुसार राज्य सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आले आहे.

सदर वेळापत्रकानुसार दिनांक १५/१२/२०२० ते दिनांक १९/१२/२०२० या कालावधीत आयुष पदव्युत्तर आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी अभ्यासक्रमासाठी राज्य स्तरीय कोटा आणि १५% ऑल इंडिया कोट्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून नोंदणी प्रक्रिया करुन घेण्यात येत आहे.

सदरील नोंदणी प्रक्रिया करताना काही उमेदवारांकडून नोंदणी अर्जामध्ये चुकिची माहिती भरण्यात आली आहे. सदरील माहिती दुरुस्त करण्याबाबत या कार्यालयास ईमेल प्राप्त होत आहेत.

त्यानुसार आयुष पदव्युत्तर आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी अभ्यासक्रमाच्या राज्यस्तरीय कोटा आणि १५% ऑल इंडिया कोट्याच्या नोंदणी अर्जामधील उमेदवाराचे नाव, ईमेल आयडी, जन्म दिनांक आणि AIA PGET या सामाईक परीक्षेचे गुण इत्यादी सोडून इतर सर्व माहिती, नोंदणी प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यंत (१९/१२/२०२०) उमेदवारांना त्यांच्या Login मधून Unlock करुन आवश्यक ती सुधारणा/दुरुस्ती करण्यासाठी देण्यात येत आहे. सदर कालावधीनंतर कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करण्याची मुभा दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई